

# विणू लागली आजी...

युरी ऑरलेव्ह

अनुवाद
निरंजन उजगरे
चित्रे
ओरा ऍटन



# विणू लागली आजी...

इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सलेशन ऑफ हिब्रू लिटरेचरच्या साहाय्याने या पुस्तकाचे प्रकाशन साध्य झाले. भारत आणि सार्क देशांत विक्रीसाठी मान्यता.

ISBN 81-237-2959-6

पहिली आवृत्ती : 1999 (*शके* 1921)
दुसरी आवृत्ती : 2003 (*शके* 1924)
मूळ हिब्रू प्रकाशन :
मजकूर © युरी ऑरलेव्ह, 1981
चित्रे © मोडान पब्लिशर्स
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1999
Granny Knits *(Marathi)*

**रु. 16.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.

नेहरू बाल पुस्तकालय

# विणू लागली आजी...

युरी ऑरलेव्ह

अनुवाद
निरंजन उजगरे

चित्रे
ओरा ऍटन



नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया


एके दिवशी आजी शहरामध्ये आली,
तिनं शहरामधून नंतर एक चक्कर टाकली,
एक पिशवी, एक काठी इतकाच ऐवज जवळ होता,
लोकर विणायच्या सुया आणि लोकरीचा गुंडा होता.






शहरामध्ये भटकली पण रहायला जागा नाही,
आजी थकून खाली बसली, पायांना सूज आली.
मग तिनं चपलांची एक जोडी विणली,
ठणकणाऱ्या पायांमध्ये हळूवार घातली.






मातीमध्ये चपला आता कशा बरं ठेवणार?
“मी सतरंजी विणणार आता, खरोखरच विणणार.”
मग आजीनं चपला ठेवायला छान सतरंजी विणली,
चपलांची जोडी सतरंजीवर अगदी जपून ठेवली.



इतकी सुंदर सतरंजी आता कुठे ठेवायची?
"काट्यात नाही, गवतात नाही," मनात म्हणाली आजी.
मग तिनं सुया घेतल्या, क्लिक-क्लिकडी-क्लिक–
लवकर लवकर विणून काढली स्वच्छ जमीन ठीक.

"जमिनीवर सतरंजी ठेवीन," आजी म्हणाली.
"पण डोकं ठेवायला जागा बरं कुठली?"
असं म्हणून आजी पुन्हा लोकर घेऊन बसली,
हळू हळू खाट विणली, चादर सुद्धा विणली,
उशीनंतर आजीला लोटीची आठवण झाली,
लोटी बनवून लगेच तिनं कोपऱ्यामध्ये ठेवली.
आणखी आजीनं झोपण्यापूर्वी
पडद्यासकट खिडकी विणली.




क्लिकडी-क्लिक-आजीनं बनवली
एक भिंत, एक खिडकी, दिव्यासाठी टोपी.
तुळईनंतर तुळई आणि भिंतीनंतर भिंत
तयार झालं अखखं घर, छप्पर आणि सगळं.




"पण मी उठणार कशी?
आवडत्या कपातल्या चहाशिवाय उठणार कशी?"
मग तिनं किटली विणली, केकसकट प्लेट विणली,
छोटे छोटे तीन कप नंतर विणू लागली.


तिला पक्कं ठावूक होतं, घर हे तेव्हाच घर असतं,
जेव्हा तुम्हाला थोडं सुद्धा एकटेपण नसतं.



आजी बसली पुन्हा नेटानं,
काय हवं तिला ते, पक्कं ठावूक होतं.
खूप मायेनं आणि कष्टानं
नातवंडांना तरतरीत आजीनं तयार केलं.
ही मुलं खट्याळ होती, मजेदार होती,
खोडकर होती, तरीसुद्धा एकदम सुंदर होती.







घराबाहेर गवत विणलं, फुलं विणली,
घरामध्ये दारं बनवली, दारांवर नाजुक नक्षी भरली.
मुलं सगळेच खेळ खेळायची,
'स्टॅच्यू' आणि कितीतरी.
नंतर आजीनं हिरवळ विणली,
सामानानं खच्चून भरलेली खोली विणून काढली.
प्रत्येक खेळ, प्रत्येक खेळणं, कपाट आणि कप्पे,
नातवंडांच्या खुशीसाठी घर तयार झाले.




खट्याळ मुलं दिवसभर हुंदडायची, खेळायची,
विणलेली सुंदर फुलं मध्येच उसवून सुद्धा टाकायची.
एकदा मुलानं मुलीचा दंड की हो धरला,
एक दोरा पकडून मुलगा जोरात खेचू लागला.
सावध मुलीनं तेव्हा मुलाचा कान घट्ट धरला
आणि त्याचा मागचा भाग तिनं उसवून टाकला!






आजीला मुळीच काळजी नव्हती,
सुया घेऊन पुन्हा ती तिच्या कामाला लागली.
मुलीच्या खांद्याचा भाग तिनं लगेच दुरूस्त केला,
आणि मुलाचा मागचा भाग पुन्हा नवीन विणला!

मुलांबरोबर खाटेवरती नंतर पडल्या पडल्या,
तिनं पुन्हा लोकर आणिं सुया हातात घेतल्या.
गोड गोड, मऊ मऊ स्वप्नं तयार झाली,
कोळ्याच्या हलक्या जाळीसारखी तरंगायला लागली.
हिवाळ्याची रात्र विणली लोकरीमधून काळ्या,
मगच तिनं खोलीमधला दिवा विझवून टाकला.





सकाळी उठून तिनं अख्खं पुस्तक विणून काढलं
आणि नातवंडांना तडक शाळेमध्ये नेलं.
नातवंडांना पहाताच मास्तरांनी थट्टा केली,
"ही तर लोकरीची मुलं" म्हणून टिंगल टवाळी केली.
"लोकरीच्या मुलांना आम्ही शिकवत नाही,
त्यांना लगेच घेऊन जा, इथे जागा नाही."





आजी म्हणाली, "हे मुळीच बरोबर नाही,
किती सुंदर मुलं ही, हुषारी पण कमी नाही.
असे वाईट वागू नका, त्यांना घालवून देऊ नका,
त्यांना एकच संधी तुम्ही देऊन बघा.
नातवंडांना शाळेमध्ये जागा मिळायलाच हवी,
लोकरीचे आहेत हा दोष, त्यांचा मुळीच नाही."



आजीनं सुचवल्याप्रमाणे
मास्तरांनी प्रश्न विचारले.
मग पुन्हा पुटपुटले, ''लोकरीच्या मुलांना
आमच्या शाळेत शिकवणार कसं?
ही तर हातांनी विणलेली मुलं–
ह्यांना वर्गात बसवणार कसं?''

आजी भडकली तरीसुद्धा गप्प नाही राहिली
ती पुन्हा लोकर काढून विणकामाला बसली.
वाकड्या तिकड्या दारांची, पिवळे गालिचे टाकलेली
मजेदार दिसणारी मोटार तयार झाली.



आता आजी थेट महापौराकडे चालली
अन्याय झाला होता, ह्यात शंकाच नव्हती.

म्युनिसिपाल्टीच्या लोकांनी तिचं ऐकून घेतलं,
पण नंतर त्यांनी जाहीर करून टाकलं.
“सगळ्याच प्रतिष्ठित ठिकाणी
विणलेल्या मुलांना बंदी हवी.”
त्यांनी सगळ्यांना तारा करून तसं कळवून टाकलं,
चहा केक घेण्यासाठी नंतर ऑफिस सोडलं.





हे सगळं बेकायदेशीर कसं बरं ठरतं?
म्युनिसिपाल्टीच्या लोकांना नक्कीच वेड लागलं!
सुया बराच वेळ क्लिक क्लिक चालत होत्या,
डबल लोकरीचा भक्कम धागा न थांबता विणत होत्या.
आजीनं बसल्या बसल्या हेलिकॉप्टर विणून काढलं
तिला कोण थांबवणार? अध्यक्षांना भेटायचं होतं!


अध्यक्ष एक उसासा टाकून मंत्र्यांबरोबर बसले
त्यांनी मुलांना प्रश्न केले आणि नंतर बोलले,
''जी मुलं लोकरीची,
त्यांना शाळेत जागा नाही.
मास्तर, महापौर बरोबरच होते
त्यांनाच योग्य कळत होते.''






अचानक ते गाव खूप प्रसिद्ध झालं
विचित्र नावाचं ते गाव खूप प्रसिद्ध झालं.
लांबून लांबून लोक तिथे येऊन जाऊ लागले
आजीबाईचं अजब घर न्याहाळून पाहू लागले.

मग महापौर, अधिकारी पुन्हा एकदा भेटले
सोन्याची खाण सापडली म्हणून एकदम खूष झाले.
"आपण ही जागा आता सुरक्षित ठेवू,
जागेवरती दिवस रात्र कडक पहारा लावू."
फुलांना अन वेलींना जपण्यासाठी त्यांनी
कठड्याची, कुंपणाची चोख व्यवस्था केली.
घर सुबक छान इतकं
शोधून सुद्धा सापडलं नसतं.





पण आजीचा संताप रोखणं
गजांना, कुंपणाला शक्य नव्हतं.
मध्यरात्री एका, सगळे झोपेत असतांना
आजीनं एकदम सुरूवात केली सगळं घर उसवायला.



फुलं, वेली, दरवाजे, झाडं,
लोकरीची जमीन आणि सारं.
एका झटक्यात सगळं उसवलं
काहीच नाही शिल्लक ठेवलं.

सगळं काही वेगात घडलं
आजीला आता कोणाचंच तोंड पहायचं नव्हतं.
केक, कप, खाट, सतरंजी
थोड्याच वेळात नाहीशी झाली.
घर उसवल्यावर सगळं
नातवंडांना उसवून टाकलं.
गोळा केल्या सुया, लोकर आणि काठी
त्यानंतर कधीच आजीला कोणी पाहिलं नाही.



आता आजी रहायला नवी जागा शोधील
तिथे पुन्हा विणायचा बेत पक्का आखील.
तिची प्रेमळ नातवंडं, मुलगा आणि मुलगी
आनंदाने खेळतील, हसतील, बागडतील
आणि माणसं जर का प्रेमळ आणि दयावान असतील
लोकरीनं विणलेल्या मुलांना अगदी सहज स्वीकारतील.
मग आजी चिडणार नाही—शांतपणे बसेल,
आणि सांगायलाच नको की—पुन्हा विणू लागेल.





Printed at Bosco Society For Printing & Graphic Training, Okhla Road, New Delhi-110 025



रु. 16.00

ISBN 81-237-2959-6

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया